# समिती दर्पण

एप्रिल २०२६

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात आठ आणि नगरमध्ये दोन अशी दहा वसतिगृहे आहेत. त्यात १३५० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर सात दशके समितीचे काम चालते.

# अभियंता होण्याच्या स्वप्नाला ‘तेजस्विनी’चे बळ

## भारत फोर्जच्या प्रकल्पाचा समितीतील १०० विद्यार्थिनींना फायदा


**अपर्णा घोडके,**
(सीएसआर समन्वयक)


ग्रामीण भागातून पुण्यात अभियांत्रिकी शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थिनींच्या शैक्षणिक खर्चाचा भार पालकांवर पडू नये, मुलींना सुलभरित्या शिक्षण घेता यावे, यासाठी भारत फोर्ज कंपनी सन २०२२ पासून तेजस्विनी प्रकल्प राबवित आहे. त्या अंतर्गत आर्थिक मदतीबरोबरच कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींचे संवादकौशल्य, आत्मविश्वास वाढविण्यात आणि बदलत्या जगाची गरज काय आहे, हे समजण्यात मोठा हातभार लागतो आहे. २० मुलींपासून सुरू झालेल्या या प्रकल्पाचा फायदा आता समितीतील १०० लाभार्थी घेत आहेत.

विद्यार्थी साहाय्यक समितीने सन २०१४ पासून सीएसआर अंतर्गत देणग्यांसाठी प्रयत्न सुरू केले. त्याला चांगला प्रतिसाद मिळत असून आज जवळपास २२ कंपन्या सीएसआरमधून समितीला मदत करीत आहेत. माजी विद्यार्थी आणि कार्यकर्ते प्रदीप मांडके यांच्या प्रयत्नातून भारत फोर्ज लिमिटेड ही कंपनी अगदी सुरुवातीपासून समितीशी जोडली गेली. ही कंपनी वेगवेगळ्या माध्यमातून समितीच्या विद्यार्थ्यांसाठी मदत करीत आहे.



सन २०२२- २३ मध्ये भारत फोर्जने समितीतील विद्यार्थिनींसाठी ‘तेजस्विनी’ प्रकल्प सुरू केला. या अंतर्गत अभियांत्रिकी शाखेत पदवी किंवा पदविका शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना मदत केली जाते. महाविद्यालयाची व वसतिगृहाची फी, त्यांचा रोजचा प्रवास खर्च, शैक्षणिक साहित्यासाठीचा खर्च या प्रकल्पांतर्गत कंपनी देते.

या प्रकल्पासाठी गरजू, होतकरू मुलींची निवड समितीच्या कार्यकर्त्या स्नेहा फडके आणि मेधा पंडित करतात. निवड झालेल्या मुलींना कंपनीकडून केवळ आर्थिक मदत दिली जात नाही, तर भारत फोर्जमधील उच्चपदस्थ अधिकारी या मुलींना मार्गदर्शनही करतात, जे त्यांच्या पुढील करिअरच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. हे मार्गदर्शक महिन्यातून किमान एकदा या मुलींशी संवाद साधतात. अभियांत्रिकीचा अभ्यास, प्रकल्प, परीक्षा या संदर्भातील मार्गदर्शनाबरोबरच दैनंदिन नियोजन, छंद, अवांतर वाचन, अभ्यासाव्यतिरिक्तच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची गरज, नोकरीसाठी मुलाखतीची तयारी याविषयीही हे अधिकारी मार्गदर्शन करतात. ग्रामीण भागातून आलेल्या, कमी संधी मिळालेल्या मुलींना पुढील वाटचालीत त्याचा उपयोग होताना दिसतो.

भारत फोर्जमधील काही अधिकाऱ्यांनी मुलींसाठी एआय तसेच लष्करातील नोकरीच्या संधी यांसारख्या विषयांवर सत्र घेतले. काही विद्यार्थिनींना भारत फोर्जमध्ये इंटर्नशिप करण्याची संधी मिळाली. या प्रकल्पाच्या यशात कंपनीच्या सीएसआर प्रमुख लीना देशपांडे यांची दूरदृष्टी आणि मुलींना मदत करण्याची तळमळ खूप मोलाची आहे. त्यांचे सहकारी प्रणव टोणगे या प्रकल्पाचा समन्वय अत्यंत बारकाईने करतात.

पान २ वर ▶

### या प्रकल्पाविषयी समितीच्या लाभार्थी विद्यार्थिनींच्या भावना...



भारत फोर्जकडून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे मला माझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यास आणि अभियांत्रिकी शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करण्यास मदत झाली. माझ्या यशात भारत फोर्जची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. आता काम करताना कंपनीतील मार्गदर्शकांनी दिलेल्या सल्ल्याचा खूप फायदा होतो.
- **तृप्ती पाचपुते,** वरिष्ठ अभियंता, टाटा एल्कसी
(मार्गदर्शक: **श्री. राहुल अरोळे**)



प्रकल्प तेजस्विनीने माझ्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कंपनीने दिलेल्या आर्थिक पाठबळामुळे अभियांत्रिकीचा प्रवास सुरळीतपणे पार पडला.
- **अंशू कुमारी,** GET- R&D Engineer, Forvia India Pvt. Ltd.
(मार्गदर्शक- **श्री. शैलेंद्र चौहान**)

# समितीत ‘कृषी उद्योजकते’ची शाळा

## एआय, रोबोटिक्स आधारित मिळणार स्मार्ट शेतीचे प्रशिक्षण

विद्यार्थ्यांना थेट मातीत उतरून आधुनिक शेतीचे धडे गिरविण्याची संधी विद्यार्थी साहाय्यक समितीने उपलब्ध करून दिली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्स तंत्रज्ञानाच्या मदतीने कमी जागेत अधिक उत्पादन घेण्यापासून शेतमालाचे स्मार्ट मार्केटिंग करण्यापर्यंतचे कौशल्य आत्मसात करण्याची संधी देणाऱ्या ‘कृषी उद्योजकता व कौशल्य विकास प्रकल्पा’चे उद्घाटन समितीच्या आवारात २४ एप्रिलला झाले.

विद्यार्थी साहाय्यक समिती आणि बारामतीतील कृषी विकास ट्रस्ट यांच्या वतीने समितीच्या सेनापती बापट रस्ता येथील आवारात युवकांसाठी हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. याच्या उद्घाटनप्रसंगी ‘सकाळ माध्यम समूहा’चे आणि समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, खजिनदार संजय अमृते, विश्वस्त तुकाराम गायकवाड, रत्नाकर मते, डॉ. ज्योती गोगटे, मनोज गायकवाड, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, विद्यार्थी साहाय्यक समिती फाउंडेशन, अमेरिकाच्या अध्यक्ष अंजली अंतुरकर, स्टुडंट वेलफेअर असोसिएशनचे संचालक राजीव भागवत, सुप्रिया केळवकर, ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ संतोष करंजे, प्रकल्प समन्वयक प्रा. ए. बी. रासकर, उद्यानविद्या विभागाचे विषय विशेषज्ज्ञ मच्छिंद्र अगळे, ‘डिजीटेक रोबोटिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड’चे संचालक अजित गटे आदी उपस्थित होते.

शिक्षण आणि शेती यातील दरी कमी करण्याच्या उद्देशाने समितीच्या आवारात अर्धा एकर जागेत हा प्रकल्प उभारला जात आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रगत शेती कशी करायची, हे यातून विद्यार्थ्यांना शिकायला मिळणार आहे. ट्रस्टतर्फे बारामतीत राबविण्यात येणारे प्रयोग शिकता येणार आहेत, असे करंजे यांनी यावेळी सांगितले.




या प्रकल्पात विद्यार्थ्यांना विषमुक्त शेतीबरोबरच तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उत्पादन घेणे, शेतीमालाचे उत्कृष्ट विपणन कौशल्य आत्मसात करण्याचा मार्ग उपलब्ध करून दिला जाणार आहे. यातून केवळ प्रगत शेतकरी नव्हे, तर शेतीतून उद्योजकतेची वाट धरणारा व्यावसायिक घडविण्याचा मानस आहे.
- **प्रतापराव पवार,** अध्यक्ष, सकाळ माध्यम समूह आणि विद्यार्थी साहाय्यक समिती

### प्रकल्पाचे टप्पे

- कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सेन्सर, स्वयंचलित हवामान केंद्र, रोबोटिक्स तंत्रज्ञान यांद्वारे स्मार्ट शेती.
- पॉलिहाऊस, छतावर शेती आणि ‘हायड्रोपोनिक्स युनिट’.
- कमी जागेसाठी ‘व्हर्टिकल शेती’.
- विद्यार्थी रिटेल आऊटलेट

### ‘डिजीटेक’समवेत करार

समितीमधील १२० विद्यार्थ्यांना ‘रोबोटिक्स’चे प्रशिक्षण देण्यासाठी डिजीटेक रोबोटिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासमवेत सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार आणि ‘डिजीटेक’चे संचालक अजित गटे यांच्यासह अन्य मान्यवरांनी स्वाक्षरी केली.

तयाचा वेलू...

# अनाथांना सनाथ बनविण्याची तळमळ

गायत्री पाठक या स्वतः अनाथ, मात्र ही ओळख त्या अलिकडेच उघड करायला लागल्या. अनाथ म्हटले की लोक कणवेने, दयाबुद्धीने बघतात आणि तसे वागवलेले त्यांना आवडत नाही. म्हणून ती ओळख पुसण्यासाठी त्यांनी केलेला प्रवास थक्क करणारा आहे.

मिरजेतील पाठक अनाथाश्रमात (आताचे बालगृह) त्या वाढल्या. तिथल्या सगळ्याच मुलांचे आडनाव पाठक. संस्थेत राहण्या- खाण्यापिण्याची सोय चांगली होती. तरी बालवयातही गायत्रीताईंना कणवेची नजर टोचायची. आपण आपल्या पायावर उभे राहायचे, हे त्यांनी तेव्हापासून ठरविले होते.

शाळेत असतानाच त्यांना गायन, नृत्य, वक्तृत्व, काव्यवाचन, खेळ अशी अनेक गोष्टींची आवड होती. विशेषतः गायनात. शाळेत असतानाच त्या विशारद झाल्या. नंतर त्यांनी संगीत विषय घेऊन एम.ए. केले. अध्यात्माच्या आवडीमुळे खूप लोकांशी संपर्क आला, विचार प्रगल्भ होत गेले. ते मांडण्याची कुवत आली.

वयाच्या अठरा वर्षांनंतर मुलेमुली बालगृहात राहू शकत नाहीत. तिथून बाहेर पडताना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद आणि तयारी पाहिजे. नाही तर मुलींसाठी पर्याय लग्न किंवा महिलाश्रम. हे दोन्ही गायत्रीताईंना नको होते. स्वाभिमानाने जगणे, हा त्यांचा ध्यास होता.

राजाभाऊ पटवर्धन यांच्याशी असलेल्या ओळखीतून त्या समितीत आल्या. समितीत प्रवेश मिळण्याएवढे गुण नव्हते, पण बाकीच्या गुणांवर प्रवेश मिळाला, असे त्या सांगतात.

सुरुवातीला समितीची शिस्त त्यांना खूप जड गेली. अनाथाश्रमात नियमांची सवय नव्हती. पण हळूहळू त्या समितीच्या शिस्तीत रुळल्या. त्याचे फायदे त्यांना कळू लागले. त्या अभ्यास करू लागल्या. मैत्रिणी मिळाल्या, अनाथपणाची धग कमी झाली. त्या म्हणतात, अन्य मुलींना घर, आईवडील होते. पण अडचणीसुद्धा होत्या. त्यांच्यावर जबाबदारीही होती. मला फक्त माझीच जबाबदारी घ्यायची होती.

सुषमा दातार यांनी घेतलेल्या गटचर्चांचा त्यांना खूप उपयोग झाला. त्यातून त्यांची Social, practical आणि rational thought process सुरू झाली. समितीने आत्मसन्मान दिला. राजाभाऊंनी कॉलेजची फी भरली पण परतफेडीच्या बोलीवर. समितीमध्ये कोणी दान देत नाही. समिती स्वकष्टाने कमाईची संधी देते, हे त्यांच्यासाठी फार महत्त्वाचे होते, असे त्या म्हणतात.

कॉलेजची फी आणि समितीत राहण्याचा खर्च भागविता यावा म्हणून त्या तीन 'कमवा- शिका' करायच्या. 'सकाळ'ची लायब्ररी, मीनाक्षीताई आपटे यांची स्वाधार संस्था येथे काम करायच्या शिवाय पोलिस वस्तीतल्या मुलांना शिकवायला जायच्या. स्वाधार संस्थेतच त्यांच्या पुढच्या कामाचा पाया घातला गेला. महिला सक्षमीकरणासाठी काम करणारी ही संस्था. येथेच गायत्री यांना महिलांच्या प्रश्नांची जाण येत गेली.



गायत्री पाठक

समितीमध्ये त्या दोन वर्षच राहिल्या. पदवीधर होण्यापूर्वी त्यांनी समिती सोडली. त्यामागे कारण होते. समितीमध्ये त्यांची पदव्युत्तर शिक्षण घेणारी मैत्रीण होती. तिने गायत्रीताईंना त्यांच्या अवघड वयात मानसिक आधार दिला. ती त्यांना आपल्या घरी घेऊन गेली. घर, कुटुंब काय असते याची ओळख तिच्यामुळे गायत्रीताईंना झाली. तिची समिती सुटणार आणि तिचा राहायचा प्रश्न येणार म्हटल्यावर त्याही तिच्याबरोबर बाहेर पडल्या. "अनाथ मुलांना मदत करायला समाज तयार असतो. मला जागा मिळू शकत होती म्हणून मग मी समितीमधून बाहेर पडले. खरे तर तेव्हा समिती आपल्यासाठी काय आहे, याची जाणीव झाली," असे त्यांनी सांगितले.

अनाथपणाची ओळख त्यांनी अशी क्वचितच, दुसऱ्याच्या फायद्यासाठी वापरली. नाहीतर ती त्यांना टोचायची. आईवडिलांचं नाव नाही म्हणून त्यांना ॲडमिशन घेणे अवघड गेले, बँक अकाऊंट उघडता येईना, आधार कार्ड नाही... ह्या सगळ्या अनुभवातूनच त्या अनाथ मुलांच्या हक्कांसाठी काम करू लागल्या.

त्यांनी कलाशाखेतील पदवी आणि पत्रकारितेतील पदविका शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी आज का आनंद, लोकमत, महाराष्ट्र टाइम्स अशा नामवंत वृत्तपत्रांसाठी काम केले.

अठराव्या वर्षानंतर बालगृहातून बाहेर पडलेल्या मुलांसाठी आयुष्य खूप अवघड असते. कोणाचा आधार नसतो, जगण्यासाठी कोणते कौशल्य हातात नसते. अशा मुलांसाठी गायत्रीताईंचा झगडा सुरू झाला. त्यांची माहिती जमविणे, संघटन करणे, त्यांच्यासाठीच्या सुविधांची (after care centres) माहिती पुरविणे, त्यांना अनाथ ओळखपत्र मिळण्यासाठी मदत करणे, आदी कामे त्या त्यांच्या 'सनाथ वेल्फेअर फाउंडेशन'मार्फत करू लागल्या. बालगृह आणि प्रशासन यांच्यातील त्या दुवा बनल्या. 'सनाथ'चा त्यांच्या मनातला अर्थ आहे, स्वतः स्वतःचे नाथ. कोणावर अवलंबून राहू नका. तुम्ही जर स्वतःच स्वतःला आधार देऊ शकला नाहीत तर आईवडिलांनी टाकल्याची कुरकुर करण्याचा तुम्हाला काय हक्क आहे, हे त्यांचे सगळ्या अनाथ मुलांना सांगणे असते.

अनाथ मुलांना सरकारी नोकरीत आरक्षण मिळवून देण्यासाठी गायत्रीताईंनी खूप प्रयत्न केले आणि ते मिळविलेसुद्धा! मात्र अजूनही सगळ्या राज्यांत ते लागू नाही. त्यासाठी त्या 'युनिसेफ'च्या मदतीने लढा देत आहेत.

गायत्रीताईंचा एक उल्लेखनीय उपक्रम म्हणजे अनाथ मुलींचं माहेरपण. यंदा त्या उपक्रमाचे चौथे वर्ष आहे. या मुलींना वर्षातून एकदा कुठेतरी जायला हक्काची जागा असावी, एवढाच त्याचा उद्देश नाही. या पाच दिवसांत आराम आणि मजा याशिवाय त्या मुलींसाठी वेगवेगळी सेशन्स त्या घेतात. त्यात करिअर मार्गदर्शन, मुलांचे संगोपन, समुपदेशन स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी कौशल्याधारित कोर्स अशा गोष्टींचा अंतर्भाव असतो.

गायत्रीताईंची शस्त्रे म्हणजे लेखणी आणि वक्तृत्व. त्यांचा उपयोग करून या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्याचे व्रत त्यांनी घेतले आहे. समितीच्या शिकवणीचा त्या नेहमी उल्लेख करतात. त्या म्हणतात, "मी कामानिमित्त कित्येक संस्था पाहिल्या आहेत, पण समितीसारखी दुसरी संस्था मला दिसली नाही."

दोन मुले आणि पती यांच्यासह गायत्रीताई पुण्यात वास्तव्यास आहेत. त्यांच्या कामात पतीची खंबीर साथ आहे. सध्या त्या सारथी राष्ट्रीय केअर लिव्हर्स असोसिएशनच्या कोअर कमिटीवर कार्यरत आहेत. त्या अंतर्गत विविध राज्यांतील मुलांचे संघटन, त्यांचे हक्क आणि अधिकार यावर काम सुरू आहे.

**(शब्दांकन- माधवी कुलकर्णी)**

# मुलींच्या भावना ऐकून गहिवरले आईवडील

## अहिल्यानगरच्या वसतिगृहात पाल्य- पालक संवाद सत्राचे आयोजन

वर्षभर समितीत राहिल्यानंतर मुलींना आलेले अनुभव तसेच कार्यकर्ते, पर्यवेक्षक, विद्यार्थिनी आणि पालक यांच्यातील नात्यावर प्रकाश टाकणारे तीन तासांचे संवाद सत्र अहिल्यानगर येथील कै. मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहात ५ एप्रिल झाले.

नगरमध्ये नव्याने सुरू झालेल्या समितीच्या मुलींच्या वसतिगृहात पाल्य- पालकांचा एकत्रित संवाद व्हावा, समितीचे ध्येय, उद्दिष्ट, कार्यपद्धती, पर्यवेक्षक, कार्यकर्त्यांचे कार्य याचा समितीतील वास्तव्यात विद्यार्थिनीना आलेला अनुभव, स्वतःमध्ये झालेले बदल, इथले वातावरण या सर्व बाबींचे हे अवलोकन होते.

वसतिगृहात प्रथम आलो, तेव्हा इथली स्वच्छता, अभ्यासास पोषक वातावरण, सर्व सोयीसुविधा पाहून मुलीला इथेच ठेवायचे, असे ठरविले. समितीचे कार्यकर्ते, पर्यवेक्षक यांचे मुलींशी असणारे पालकत्वाचे नाते पाहावयास मिळाले. सुरक्षा, वैयक्तिक लक्ष, प्रगती अनुभवायला मिळाली, अशा भावना पालकांनी यावेळी व्यक्त केल्या. कार्यकर्ते रवींद्र देशपांडे यांनी या सत्रामागची भूमिका आणि आत्तापर्यंतच्या कार्याचा आढावा घेतला. सौ. सुनीता झिंजाड यांनी यावर्षी वसतिगृहात घेतलेल्या स्पर्धेत आणि महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींनी मिळविलेल्या यशाची माहिती दिली. शिवाजी बोलभट यांनी पुण्यात शिक्षण घेताना समितीचा कसा फायदा झाला, हे सांगितले.

आलेल्या पालकांचे त्यांच्याच पाल्यांनी गुलाबपुष्प आणि पालकांविषयींच्या भावना व्यक्त करणारे भेटकार्ड देऊन स्वागत केले. यातील प्रातिनिधीक भावनांचे वाचन विद्यार्थिनींनी केले. यावेळी उपस्थित पालकांच्या आणि विद्यार्थिनींच्या डोळ्यांत अश्रू होते. काही मुलींना हुंदके आवरता आले नाहीत. कार्यकर्ते आणि पर्यवेक्षक यांचेही डोळे पाणावले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्या सुनीता झिंजाड, नंदकुमार देशपांडे यांनी प्रयत्न केले. कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी भ्रमणध्वनीद्वारे संवाद साधला. पर्यवेक्षक विद्या सूर्यवंशी यांनी पालकांचे, कार्यकर्त्यांचे आभार मानले..



# शिकविण्याचा अनुभव आत्मविश्वास वाढविणारा

## सामाजिक जाणीव प्रकल्पात सहभागी विद्यार्थिनींची प्रतिक्रिया

समितीत प्रवेश मिळालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला कमवा व शिका योजना अनिवार्य आहे. पुण्यात उच्च शिक्षण घेत असताना किमान आपल्या गरजा भागविण्याइतपत पैसे मिळवावेत, यातून वेळेचे व्यवस्थापन, थेट कामाचा अनुभव आणि पैशाचे मोल लक्षात येते, हा त्यामागचा उद्देश. सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत समितीचे विद्यार्थी जवळपासच्या महापालिका शाळांमधून विद्यार्थ्यांसाठी आनंददायी शिक्षणातून काही उपक्रम राबवितात. असे काम केलेल्या प्रातिनिधीक विद्यार्थ्यांच्या बोलक्या प्रतिक्रिया–

"मुलांना समजून घेणे, किती महत्त्वाचे आहे, प्रत्येक मुलाची समज वेगळी असते, त्यांना त्यांच्या पातळीवर जाऊन शिकविणे, गरजेचे आहे, हे लक्षात आले. त्यातून माझा आत्मविश्वास वाढला. जबाबदारीची जाणीव झाली.

- **ज्ञानेश्वरी सांडभोर,** डॉ. अ. शं. आपटे वसतिगृह

"मुलांना शिकविण्याचा अनुभव अत्यंत आनंददायी आणि समृद्ध करणारा होता. मी विषय सोप्या आणि रंजक पद्धतीने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मुलांनी त्याला दिलेला सकारात्मक प्रतिसाद पाहून खूप आनंद झाला. या अनुभवातून मला संयम, संवाद कौशल्य आणि शिकविण्याच्या पद्धती याबाबत नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या.

- **साक्षी पठाडे,** मुलींचे नवीन वसतिगृह

"विद्यार्थ्यांशी कसे वागले पाहिजे आणि त्यांच्याकडून अभ्यास कसा करून घेतला पाहिजे, त्यांना शिकण्यासाठी प्रेरित कसे करायचे, हे लक्षात आले. विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोहोचवण्यासाठी सोपी आणि प्रभावी पद्धत कशी असावी, हे समजले. त्यासाठी स्वतःचा ज्ञानसाठा वाढविण्याकरीता विविध विषयांची पुस्तके वाचण्याची संधी मिळाली.

- **साक्षी आल्टे,** मुलींचे नवीन वसतिगृह, पुणे

"बालवीर शिरीषकुमार शाळेत आठवी- नववीच्या विद्यार्थ्यांना शिकविले. त्यांना शिकविताना लक्षात आले की, आपल्याला सोपे वाटणारे ज्ञान इतरांना समजावून सांगणे अवघड असते. त्यांच्या वाचन- लेखनात सुधारणा होताना आणि गणित सोपे करून शिकविल्यावर त्यांना होणारा आनंद पाहताना खूप समाधान मिळाले. रस्त्यात भेटल्यावर त्यांनी 'ताई' म्हणून हाक मारणे, माझ्यासाठी एक बक्षीस होते.

- **कीर्ती रामू धलवार,** डॉ. अ. शं. आपटे वसतिगृह

"सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत मी गणिताचे अध्यापन केले. विद्यार्थ्यांना संकल्पना समजल्यावर त्यांच्याकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे आत्मविश्वास वाढला. यातून माझे संवादकौशल्य आणि शिकविण्याची पद्धत सुधारली. हा अनुभव माझ्यासाठी प्रेरणादायी आणि उपयुक्त ठरला.

- **हर्षदा शेलार,** डॉ. अ. शं. आपटे वसतिगृह

▶पान १ वरून

## या प्रकल्पाविषयी समितीच्या लाभार्थी विद्यार्थिनींच्या भावना...



"मार्गदर्शकांचे सातत्यपूर्ण सहकार्य आणि मार्गदर्शन यामुळेच हे यश संपादन करणे शक्य झाले.

- **शिवांजली घाडगे,**
Estimation and Design Engineer at Subodhan Engineers
(मार्गदर्शक- **श्री. किरण गायकवाड**)



"अशोक लेलँड सारख्या चांगल्या कंपनीमधील नोकरीची ऑफर स्वीकारण्याऐवजी, उच्च शिक्षण पुढे सुरू ठेवण्याचा निर्णय घेणे, भारत फोर्जने दिलेल्या आर्थिक सहाय्यामुळे सोपे झाले.

- **समीक्षा लहरे,** तृतीय वर्ष- इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग
(मार्गदर्शक- **श्री. राहुल लाळे**)



"भारत फोर्जमध्ये केलेल्या इंटर्नशिपचा खूप फायदा झाला. आत्मविश्वास खूप वाढला.

- **वैष्णवी पांचाळ,** चौथे वर्ष, मेकॅनिकल इंजिनीअरिंग
(मार्गदर्शक: **श्री. दिनेश दौंडकर**)

# डॉ. कमलेश सोमण यांचा कार्यकर्त्यांशी संवाद



जे. कृष्णमूर्ती यांच्या जन्मशताब्दीनिमित्त प्रख्यात साहित्यिक डॉ. कमलेश सोमण यांचे 'निवृत्तीशील मनाकडे' या विषयावर समितीच्या कार्यकर्त्यांसाठी १६ एप्रिलला संवादसत्र झाले. यात ज्येष्ठत्वाकडून निवृत्तीशील मनाकडे कसा आध्यात्मिक प्रवास असावा, याविषयी डॉ. सोमण यांनी सोदाहरण विवेचन केले. यावेळी निवृत्त न्यायाधीश आणि कवी जीवन आनंदगावकर उपस्थित होते. दोघांनीही त्यांची पुस्तके समितीच्या ग्रंथालयासाठी भेट दिली.